# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१

पीबीएक्स ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४ फॅक्स ०२०-२६१२७००७/२६१३२४०१

Email :- dirmktms@gmail.com website-www.mahapanan.maharashtra.gav.in


जा.क्र. पणन-५/कृउबास/मंत्री सभा/निर्देश/धा.चा.यं/२०२१/६१६ दिनांक :- १५ फेब्रुवारी, २०२१

**विषय- शेतकऱ्यांना रास्त भाव मिळण्यासाठी सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी धान्य चाळण यंत्र बसविण्यासाठी कार्यवाही करणेबाबत**

**: परिपत्रक :**

राज्यातील शेतकरी त्यांनी उत्पादीत केलेला शेतमाल विक्रीसाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आणत असतात. त्यापैकी अन्नधान्ये, कडधान्ये, तेलबिया इ. प्रकारच्या शेतमालाची चाळण यंत्राद्वारे साफसफाई करुन त्यातील काडी-कचरा वेगळा करणे आवश्यक असते. जेणेकरुन सदर बाबींमुळे या शेतमालाचा FAQ दर्जा गाठण्यास सहाय्य होते व शेतकऱ्यास योजने अंतर्गत लागू असलेल्या शेतमालाकरिता किमान आधारभूत किंमतीचा लाभ होतो.

धान्य चाळण यंत्राची व्यवस्था शेतकरी हिताच्या दृष्टीने कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने यापूर्वी वेळोवेळी शासनाने बाजार समित्यांकडे या संदर्भात पाठपुरावा केलेला आहे.तथापि अनेक बाजार समित्यांनी अद्याप धान्य चाळण यंत्रे बसविलेली नाहीत किंवा ज्या बाजार समित्यांनी असे धान्य चाळण यंत्र बसविलेले आहे तेथे त्याचा वापर परिणामकारकरित्या केल्याचे दिसून येत नाही. या संदर्भात दि. ९.२.२०२१ रोजी मा.मंत्री (सहकार व पणन) व मा.मंत्री (कृषि) यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये राज्यातील सर्व बाजार समित्यांनी बाजार समित्यामध्ये धान्य चाळण यंत्र व मॉईश्चर मिटरची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

केंद्र शासन पुरस्कृत ई-नाम योजने अंतर्गत तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गतही अनुदान तत्त्वावर राज्यातील अनेक बाजार समित्यांना धान्य चाळण यंत्र मंजूर करण्यात आलेली आहे. तथापि काही बाजार समित्यांनी अनुदान उपलब्ध असून देखील धान्य चाळण यंत्र बसविण्यास अनास्था दाखवली आहे अथवा थेट नकार दर्शविलेला आहे. ही बाब गंभीर असून, ज्या उद्देशासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्याची स्थापना झालेली आहे त्या उद्देशालाच छेद देणारी आहे.

२.



Scanned by CamScanner

यास्तव राज्यातील सर्व बाजार समित्यांनी विशेषत: ज्या बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अन्नधान्ये, कडधान्ये, तेलबिया इ. शेतमालाची आवक आहे त्यांनी तातडीने धान्य चाळण यंत्र बसवून घ्यावे. तसेच शेतमालाची आर्द्रता तपासण्यासाठी आर्द्रता मापक यंत्र (मॉईश्चर मिटर) याचीही खरेदी करुन शेतकऱ्यांसाठी त्याचा वापर करावा.

वर नमूद मंजूर योजनेखाली वा स्वनिधीतून धान्य चाळण यंत्र बसवून घेणे सर्व बाजार समित्यांना आवश्यक आहे याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास पाठवावा. तसेच ज्या बाजार समित्यांनी यापूर्वीच धान्य चाळणी यंत्र बसविले आहे त्यांनी त्याचे वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून उचित प्रचार करुन त्याचा वापर परिणामकारकरित्या होईल याबाबत तातडीने कार्यवाही सुरु करावी.

(सतिश सोनी)
**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति ,
१) सभापती / सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

प्रत :
३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व) यांना सूचित करण्यात येते की, आपण उपरोक्त बाबींचा आढावा
घेवून पुर्तता होईल असे पहावे.

प्रत माहितीस्तव सादर-
मा.प्रधान सचिव (पणन), मंत्रालय, मुंबई-३२

प्रत माहीतीस्तव-
१) खाजगी सचिव, मा.मंत्री, सहकार व पणन, मंत्रालय, मुंबई-३२
२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे



Scanned by CamScanner